महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.१२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४७७ दिनांक ०४ / ०१ / २०१४

विषय : कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचाराकरिता अग्रीम रक्कम मंजूर करण्याच्या अधिकारांबाबत.

संदर्भ : १) सा.आ. क्र.२० (क) दि. १७.०६.१९६३.
२) स.स्था.आ.क्र.३७७ दि.३०.०८.१९५८ चे सुधारपत्र क्र.१२ दि.१२.०२.१९९८.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि.१९.०५.२००६.
४) प्रशासकीय परिपत्रक क्र.२७२ दि.३०.१२.२००९.
५) प्रशासकीय परिपत्रक क्र.२९७ दि.०७.०७.२०१०.

.....

कामावर असताना कंपनीच्या कर्मचाऱ्यास अपघात झाल्यास त्यावर तात्काळ वैद्यकीय उपचार सुरू करता यावेत म्हणून स.स्था.आ.क्र.३७७ दि.३०.०८.१९५८ चे सुधारपत्र क्र.१२ दि.१२.०२.१९९८ अन्वये तात्पुरती अग्रीम रक्कम मंजूर करण्याचे अधिकार क्षेत्रिय कार्यालयातील अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत. तसेच सदरची रक्कम मंजूर करण्याबाबतचे अधिकार वेळोवेळी सुधारित करण्यात आलेले आहेत.

२. तथापि, अपघात झालेल्या कर्मचाऱ्यांवर रुग्णालयामध्ये उपचार पूर्ण झाल्यानंतर संबंधित रुग्णालयाची देयके अशा कर्मचाऱ्यांची वैद्यकीय रजा, उपचार दरम्यान झालेला मृत्यू इत्यादी कारणांमुळे अदा करताना बराचसा विलंब होतो. यास्तव त्या त्या रुग्णालयांची कंपनीच्या अपघातग्रस्त कर्मचाऱ्यांवर केलेल्या उपचारापोटी प्रलंबित देयके त्वरित अदा करता यावीत या दृष्टीकोनातून अग्रीम रक्कमेच्या मंजुरीकरिता प्रदान करण्यात आलेल्या अधिकारामध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

३. आता व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त) आणि कार्यकारी संचालक (मासं) यांच्याशी विचारविनियम करुन कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचाऱ्यांना अग्रीम रक्कम मंजूर करण्याकरिता पुर्वी प्रदान करण्यात आलेले अधिकार खालीलप्रमाणे सुधारित करण्यास मंजुरी दिलेली आहे.

| अ. क्र. | क्षेत्रिय/सांघिक कार्यालयातील सक्षम अधिकारी | पुर्वीची तरतूद (प्र.प.क्र.२९७ दि.०७.०७.२०१०) अग्रीम राशीची रक्कम | सुधारित तरतूद (अग्रीम राशीची रक्कम) |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | रु.१०,०००/- | रु.२०,०००/- |
| २ | अधीक्षक अभियंता | रु.१५,०००/- | रु.३०,०००/- |
| ३ | मुख्य अभियंता | रु.५०,०००/- | रु.१,००,०००/- |
| ४ | सबंधीत प्रादेशिक कार्यकारी संचालक / कार्यकारी संचालक (सां.नि.) | रु.५०,००१/- ते रु.१,००,००० पर्यंत | रु.३,००,०००/- |
| ५ | संचालक (वित्त) | रु.१,००,००१ ते ७,००,०००/- पर्यंत | रु.३,००,००१ ते ७,००,०००/- पर्यंत |
| ६ | व्यवस्थापकीय संचालक | रु.७,००,०००/- पेक्षा अधिक रकमेसाठी | रु.७,००,०००/- पेक्षा अधिक रकमेसाठी |

४. अपघातग्रस्त कर्मचाऱ्यांवर रुग्णालयातील उपचार पूर्ण झाल्यानंतर रुग्णालयाने त्यास तातडीने डिस्चार्ज करावे याबाबत संबंधीत विभागाच्या/मंडलाच्या/परिमंडळाच्या अधिकाऱ्यांनी त्या त्या प्रकरणी रुग्णालयात झालेल्या वैद्यकीय खर्चाची देयके १५ दिवसात अदा करण्यात येतील याबाबतचे हमीपत्र द्यावे. तसेच कर्मचाऱ्यास रुग्णालयामधून डिस्चार्ज केल्यास अथवा कर्मचाऱ्याचे उपचार सुरू असताना निधन झाल्यास वैद्यकीय अग्रीम तात्काळ मंजूर करण्यात यावा व सदर अग्रीम रक्कमेचा धनादेश रुग्णालयाच्या नावाने अदा करण्यात यावा.

५. कामावर असताना अपघात झाल्यास उपचारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती मंजूर करण्याकरिता प्रशासकीय परिपत्रक क्र.२७२ दि.३०.१२.२००९ मधील परिच्छेद क्र.३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.२९७ दि.०७.०७.२०१० मध्ये तदनुषंगिक बदल करण्यात येत असून इतर अटी व शर्ती अबाधित राहतील.

६. अशा प्रकारची प्रलंबित प्रकरणे सदर प्रशासकीय परिपत्रकातील तरतुदीनुसार निकाली काढण्यात यावीत. पुर्वी निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांचा पुर्नविचार करण्याची आवश्यकता नाही.

७. सदर परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

(संदेश हाके)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Hospital\Adm.Cir.Medical Reimbursement - Accident.doc*